महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:- Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२३/प्र.क्र.३९९/एसएम-२ दिनांक २४ जुलै, २०२४

मान्यता पत्र

प्रति,

अध्यक्ष / सचिव,

बहिर्जी स्मारक विद्यालय शिक्षण संस्था,

वापटी, ता.वसमत, जि.हिंगोली.

**विषय-** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळाचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र

**बहिर्जी स्मारक विद्यालय शिक्षण संस्था, वापटी, ता.वसमत, जि.हिंगोली संचलित बहिर्जी स्मारक विद्यालय वसमत इंग्रजी माध्यम स्कूल व बहिर्जी महाविद्यालय, गट क्र.१५५, वसमत, ता.वसमत, जि.हिंगोली**

**संदर्भ-** इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२३/प्र.क्र.३९९/एसएम-२, दिनांक २१/०६/२०२३

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **बहिर्जी स्मारक विद्यालय शिक्षण संस्था, वापटी, ता.वसमत, जि.हिंगोली संचलित बहिर्जी स्मारक विद्यालय वसमत इंग्रजी माध्यम स्कूल व बहिर्जी महाविद्यालय, गट क्र.१५५, वसमत, ता.वसमत, जि.हिंगोली (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ)** ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरू करण्याकरीता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून **बहिर्जी स्मारक विद्यालय शिक्षण संस्था, वापटी, ता.वसमत, जि.हिंगोली संचलित बहिर्जी स्मारक विद्यालय वसमत इंग्रजी माध्यम स्कूल व बहिर्जी महाविद्यालय, गट क्र.१५५, वसमत, ता.वसमत, जि.हिंगोली (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ)** ही नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर सुरू करण्यासाठी, अटी व शर्तीसह संदर्भाधिन इरादा पत्र दिले होते. सदर शाळेस आता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता पत्र देण्यात येत आहे.

३. **अटी व शर्ती:-**

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशाची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

PRESIDENT Principal

२) नोदणीकृत सस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशाचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकाचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयंअर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदीचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकाचे किंवा प्रमाणकाचे अथवा अटी व शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळीं, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

(विवेक सपकाळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प.हिंगोली.
७. निवडनस्ती (एसएम-२)(३९९/२०२४)

PRESIDENT

Principal

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४४७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
Email ID :- sm2.sesd-mh@gov.in

क्रमांक : एसएफएस १०२३/प्र.क्र.३९९/एसएम-२ दिनांक : १२ मार्च, २०२५

मान्यता पत्र (शुध्दीपत्रक)

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
बहिर्जी स्मारक विद्यालय शिक्षण संस्था,
वापटी, ता.वसमत, जि.हिंगोली.

विषय - महाराष्ट्र स्वयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी देण्यात आलेल्या मान्यता पत्राबाबत...

**बहिर्जी स्मारक विद्यालय शिक्षण संस्था, वापटी, ता.वसमत, जि.हिंगोली संचलित बहिर्जी स्मारक विद्यालय वसमत इंग्रजी माध्यम स्कूल व बहिर्जी महाविद्यालय, गट क्र.१५५ वसमत, ता.वसमत, जि.हिंगोली**

संदर्भ- मान्यता पत्र, क्रमांक एसएफएस १०२३/प्र.क्र.३९९/एसएम-२, दि.२४.०७.२०२३

महाराष्ट्र स्वयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **बहिर्जी स्मारक विद्यालय शिक्षण संस्था, वापटी, ता.वसमत, जि.हिंगोली संचलित बहिर्जी स्मारक विद्यालय वसमत इंग्रजी माध्यम स्कूल व बहिर्जी महाविद्यालय, गट क्र.१५५, वसमत, ता.वसमत, जि.हिंगोली (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ)** ही नवीन शाळा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून स्वयअर्थसहाय्यित तत्वावर सुरू करण्यास अटी व शर्तीच्या अधीन राहून संदर्भाधिन मान्यता पत्र देण्यात आले आहे. सदर संस्थेने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने संदर्भाधिन मान्यता पत्रातील शाळेचे नाव "बहिर्जी स्मारक विद्यालय वसमत इंग्रजी माध्यम स्कूल व बहिर्जी महाविद्यालय" ऐवजी "बहिर्जी इंटरनॅशनल स्कूल" असे वाचावे.

(प्रमोद कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३) संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) विभागीय शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प.हिंगोली.
७) निवडनस्ती, (कार्या. एसएम-२)/२०२५.

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४४७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

Email ID :- sm2.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२३/प्र.क्र.३९९/एसएम-२ (ई-११५०२३७) दिनांक:- ३० डिसेंबर, २०२५

**मान्यता पत्र (शुध्दीपत्रक)**

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
बहिर्जी स्मारक विद्यालय शिक्षण संस्था,
वापटी, ता.वसमत, जि.हिंगोली.

**विषय** - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी दिलेल्या मान्यतेबाबत...
**बहिर्जी स्मारक विद्यालय शिक्षण संस्था, वापटी, ता.वसमत, जि.हिंगोली संचलित बहिर्जी विद्या मंदीर, गट क्र.१५५, वसमत, ता.वसमत, जि.हिंगोली**

**संदर्भ**-१) मान्यता पत्र, क्रमांक एसएफएस-१०२३/प्र.क्र.३९९/एसएम-२, दि.२४.०७.२०२४.
२) समक्रमांकाचे मान्यता पत्र (शुध्दिपत्रक), दि.१२.०३.२०२५.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत बहिर्जी स्मारक विद्यालय शिक्षण संस्था, वापटी, ता.वसमत, जि.हिंगोली संचलित बहिर्जी स्मारक विद्यालय वसमत इंग्रजी माध्यम स्कूल व बहिर्जी महाविद्यालय, गट क्र.१५५, वसमत, ता.वसमत, जि.हिंगोली या प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ.१ ली ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ) नवीन शाळेस शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शाळा सुरू करण्यास अटी व शर्तींच्या अधीन राहून संदर्भ क्र.१ येथे नमूद मान्यता पत्र देण्यात आले आहे. तसेच, संस्थेने दि.३०.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने संदर्भ क्र.२ येथे नमूद, मान्यता पत्र (शुध्दिपत्रक) दि.१२.०३.२०२५ अन्वये शाळेच्या नावात "बहिर्जी स्मारक विद्यालय वसमत इंग्रजी माध्यम स्कूल व बहिर्जी महाविद्यालय" ऐवजी "बहिर्जी इंटरनॅशनल स्कूल" असा बदल करण्यास परवानगी देण्यात आली होती.

सदर संस्थेने दि.१५.११.२०२५ व दि.२७.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने सदर शाळेचे नाव **"बहिर्जी इंटरनॅशनल स्कूल"** ऐवजी **"बहिर्जी विद्या मंदीर"** आणि शाळेची मंडळ संलग्नता **"राज्यमंडळ"** ऐवजी **"सी.बी.एस.ई."** अशी वाचावी.

PRAMOD VITHOBA KADAM

(प्रमोद कदम)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत -

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

PRESIDENT

Principal